महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in
Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**फाईल क्र.१४७७(१)/२०२१/२०** **दिनांक : ३० मार्च, २०२२**

## प्रसिध्दीपत्रक

**विषय :- राज्य सेवा (पूर्व) परीक्षा - २०२१ निकालाबाबत**

**संदर्भ :- पूर्व परीक्षा जाहिरात क्र. १०६/२०२१**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २३ जानेवारी, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०२१ चा निकाल दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावांची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या https://mpsc.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांच्या पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी विहित कालावधीत अर्ज करणाऱ्या व परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

**३.** आवश्यक तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**४.** मुख्य परीक्षा दिनांक ७, ८ व ९ मे, २०२२ रोजी घेण्यात येईल.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या / समांतर आरक्षणाच्या / इतर मुद्यांसंदर्भात विविध मा.न्यायालयात / मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे (एसएमएस) कळविण्यात येत आहे.

**७.** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरिता स्वीकारार्ह ठरतील.

ठिकाण :- मुंबई

उपसचिव
(राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.